श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर

अहवाल

सत्र **2024- 25** विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळ

सत्र 2024-25 साठी विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळाच्या प्रभारी प्राध्यापकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळाच्या कार्यक्रमांची सुरुवात महाविद्यालयाच्या वर्धापनदिनी म्हणजे 16 जुलै 2024 ला दीपकळी वार्षिक अंकाच्या प्रकाशनाने झाली. या कार्यक्रमाला श्री अनिल शेंडे प्रमुख तिथे म्हणून उपस्थित होते. प्रभारी प्राध्यापक स्मिता चावके यांनी याप्रसंगी दीपकळी चे विषय आणि कामाबाबत प्रस्तावना सादर केली व संपादकीय मनोगत देखील मांडले. याच दिवशी डॉ अमृता भुस्कुटे यांच्या ICSSR च्या Major Research Project च्या 'मनोदय - मेंटल हेल्थ इंटरनॅशनल प्रोग्राम'च्या मॅन्युअलचे आणि डॉ कुकेकर मॅडम यांच्या पोषण आणि आहार या विषयावरील दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

यानंतर 6 ते 8 ऑगस्ट 2024 दरम्यान विद्यार्थिनी उदबोधन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या उद्घाटनाला डॉ माधवी मार्डीकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थिनी अनुकुल असलेले महत्त्वाचे विभाग, IQAC Cells आणि नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने झालेले महत्त्वाचे बदल याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या वार्षिक कार्यक्रमांच्या यादीत असलेला उद्बोधन कार्यक्रम शैक्षणिक क्षेत्राची सुरुवात करताना किती महत्त्वाचे आहे हे लक्षात आले. कारण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या सत्रात लागू झाल्याने नवीन बदललेल्या शैक्षणिक रचनेची विद्यार्थिनींना ओळख करून देण्यात ओरिएंटेशन प्रोग्राम यशस्वी ठरला आणि आणि विषयांची निवड, त्यांचे वेळापत्रक, त्यांना असलेले मार्क, परीक्षेच्या विषयांव्यतिरिक्त विद्यार्थिनींनी करावयाच्या उपक्रमांची माहिती त्यांना दिल्या गेली आणि अनुषंगाने होऊ शकणारा गोंधळ टाळल्या गेला. उद्बोधन कार्यक्रमाचा समारोप आरोह संस्थेच्या प्रमुख विशाखा राव मॅडम यांच्या उपस्थितीत पार पडला.

त्याच उद्बोधन सत्राच्या पहिल्या दिवशी विद्यार्थीनी उत्कर्ष मंडळाच्या सदस्यांनी तसेच स्नेहसंमेलन समिती ऐवजी नव्याने तयार करण्यात आलेल्या को - करिक्युलर ॲक्टिव्हिटीज कमिटीच्या सदस्यांनी देखील आपापली जबाबदारी पार पाडण्याची शपथ घेतली व विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळाचे उद्घाटन देखील करण्यात आले

दिनांक 5 सप्टेंबर 2024 ला शिक्षक दिनाच्या निमित्ताने नेहमीप्रमाणे कार्यक्रम पार पडला. विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळाच्या मुख्य जबाबदाऱ्यांपैकी एक म्हणजे आपल्याकडे जवळजवळ 40 - 45 वर्षापासून सुरू असलेल्या अंतर-महाविद्यालयीन आणि आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा.

विमल पत्तरकीने सुगम संगीत स्पर्धा ही महाविद्यालय स्तरावर होते आणि ती 9 जानेवारी 2025 ला पार पडली. त्यासाठी सौ. सीमा सराफ मॅडम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या तर आपल्याच माजी विद्यार्थिनी भार्गवी बाबरेकर आणि अवंतिका अटाळकर यांनी परीक्षणाची जबाबदारी पार पडली. या स्पर्धेत दीपश्री गावंडे हिला प्रथम, वैदेही बांगडे हिला द्वितीय आणि उन्नती देशमुख हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

आंतर महाविद्यालयीन राजेंद्र राठी निबंध स्पर्धा मार्च 2025 मध्ये घेण्यात आली. या निबंध स्पर्धेचा विषय ‘नद्यांचे पुनरुज्जीवन वास्तव आणि आव्हाने’ असा होता. या स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी सौ सुप्रिया दांडेकर यांनी पार पडली. या स्पर्धेत जी. एस. कॉलेजच्या प्रीती पटेल हिने प्रथम पारितोषिक आणि फिरती वैजयंती पटकावली. मात्र त्यानंतर 18 मार्च 2025 पासून आयोजित वा मा दमले नाट्यभिन्नय स्पर्धा, नागदेव गझल स्पर्धा आणि सुंदर वक्तृत्व स्पर्धा, या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा सामाजिक अस्थिरतेच्या परिस्थितीमुळे आणि संचारबंदीमुळे यावर्षी रद्द कराव्या लागल्या. अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ दिनांक 27 मार्च 2025 रोजी पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उज्वल लांजेवार यांनी अध्यक्षस्थान भूषवले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

नागपूर शिक्षण मंडळातर्फे 26 जाने. 2025 रोजी गणतंत्र दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा घेण्यात अली. त्याचा विषय - सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय असा होता. यावर्षी आधी महाविद्यालयीन स्तरावर एक निवड फेरी घेण्यात आली. त्याचे परीक्षण प्रा. बर्गे, प्रा. डॉ चौधरी, डॉ शंभरकर, डॉ मराठे यांनी केले. गणतंत्र दिनाच्या कार्यक्रमात वरिष्ठ महाविद्यालयातून भाविका खरवडे हिला आणि कनिष्ठ महाविद्यालयातून आरुषी भेंडे हिला सर्वोत्कृष्ट पोस्टर चे पारितोषिक देण्यात आले.

यावर्षी, आलेल्या शासन पत्रकाप्रमाणे संविधान गौरव महोत्सव देखील आयोजित करण्यात आला. यामध्ये निबंध स्पर्धा प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि विद्यार्थिनींचे सेमिनार आयोजित करण्यात आले. यामधील विजेत्या स्पर्धांना अंतिम वर्षाच्या समारोप कार्यक्रमाच्या वेळी पारितोषिके प्रदान करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वेगवेगळ्या महापुरुषांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पण कार्यक्रम देखील पार पडले. त्यामध्ये वेगवेगळे विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनाविषयी वाचन करून थोडक्यात आपले विचार सर्वांसमोर मांडले. विद्यार्थ्यांना माइक वर बोलण्याची संधी या निमित्ताने मिळते आणि त्याचा चांगला परिणाम होतो, असे निदर्शनास आले.

विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळासाठी या सत्रात रु. 33012/- इतका खर्च झाला. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा न झाल्याने हा खर्च काही प्रमाणात कमी झाला.

यावर्षी झालेल्या कार्यक्रमाचा गोषवारा -

| क्र. | कार्यक्रम | दिनांक | प्रमुख अतिथी | पारितोषिके |
|---|---|---|---|---|
| 1 | दीपकळी प्रकाशन | 16 जुलै 2024 | अध्यक्ष- श्री मोहितजी शहा, प्रमुख अतिथी - ज्येष्ठ कवी श्री अनिलजी शेंडे विशेष अतिथि- ऍड. श्री. राजीव देव | मराठी - ईशा बुरडे, शिवानी दुबे<br>संस्कृत - कु ललिता बाडमेरा,<br>इंग्रजी - कु कृतिका जोशी<br>हिंदी - कु. कविता गुप्ता<br>सर्वोत्कृष्ट लेख - कु सीमा यादव |
| 2 | उद्‌बोधन कार्यक्रम आणि VUM & Co-Curricular Committee Inauguration | ६-८ ऑगस्ट २०२४ | उद्‌घाटन -डॉ माधवी मार्डीकर, समारोप - विशाखा राव मॅडम | १२ वी -<br>१. Dakeshwari Verma<br>२. Shankari Durge<br>३. Mahak Gour<br>४. Sayma Parveen Mo. Ejaj<br>५. Gulnaz Pathan<br>६. Nandini Sharma<br>७. Anjali Raut<br>SET- Philosophy<br>Dhanashri Gawalkar<br><br>BEST PLAYER<br>Ms. Vanshika Koche |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | देशभक्तांची नावे लिहिण्याची स्पर्धा | 15 ऑगस्ट 2024 | – | 112 विद्यार्थिनींचा सहभाग |
| 4 | शिक्षक दिन | 5 सप्टेंबर 2024 | – | – |
| 5 | विमल पत्तरकीने सुगम संगीत स्पर्धा | 9 जाने. 2025 | सौ. सीमा सराफ मॅडम, परीक्षक - भार्गवी बाबरेकर आणि अवंतिका अटाळकर | प्रथम- दीपश्री गावंडे द्वितीय- वैदेही बांगडे उत्तेजनार्थ - उन्नती देशमुख |
| 6 | आंतर-महाविद्यालयीन राजेंद्र राठी निबंध स्पर्धा (विषय 'नद्यांचे पुनरुज्जीवन वास्तव आणि आव्हाने') | मार्च 2025 | परीक्षक - सौ सुप्रिया दांडेकर | प्रथम पारितोषिक आणि फिरती वैजयंती- प्रीती पटेल ( जी. एस. कॉलेज) |
| 7 | नागपूर शिक्षण मंडळ- गणतंत्र दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा (विषय - सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय) | २६ जाने. 2025 | महाविद्यालयीन स्तरावर पोस्टर निवडण्यासाठी परीक्षण -प्रा. बर्गे, प्रा. डॉ चौधरी, डॉ शंभरकर, डॉ मराठे | वरिष्ठ - भाविका खरवडे कनिष्ठ - आरुषी भेंडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | संविधान गौरव महोत्सव - निबंध स्पर्धा (विषय- भारतीय संविधान) | फेब्रुवारी 2025 | प्रा. हेडाऊ | प्रथम- गुलनाझ पठाण<br>द्‌वितीय - गुलफिरोजीया पठाण |
| 9 | संविधान गौरव महोत्सव -प्रश्नमंजुषा स्पर्धा | | डॉ शंभरकर , डॉ जोशी | प्रथम- रोशनी शाहू<br>द्‌वितीय - अंजली राऊत<br>तृतीय - जया लारोकर |
| 10 | संविधान गौरव महोत्सव -सेमिनार | | डॉ शंभरकर , डॉ जोशी | प्रथम- मेघा पानतावणे<br>द्‌वितीय - शंकर दुर्गे<br>तृतीय - संतोषी शाहू |
| 11 | VUM समारोप, अंतिम वर्षाच्या विद्‌यार्थिनींचा निरोप समारंभ आणि बक्षिस वितरण | 27 मार्च 2025 | प्राचार्य डॉ उज्वल लांजेवार | Star Sports Player<br>1. Vanshika Thakre<br>2. Anushka Mate |

या शैक्षणिक सत्रामध्ये आपल्या महाविद्‌यालयातील विद्‌यार्थिनी अनेक आंतरमहाविद्‌यालयीन स्पर्धांमध्ये सहभागी झाल्या. आंतरमहाविद्‌यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग आणि प्राप्त पारितोषिके खालीलप्रमाणे -

| क्र. | स्पर्धा | आयोजक | दिनांक | पारितोषिके |
|---|---|---|---|---|
| 1 | निबंध स्पर्धा | राजाराम वाचनालय, नागपूर | 15 सप्टेंबर 2024 | द्‌वितीय - दीपश्री गावंडे<br>उत्तेजनार्थ- प्रियंका खडसे |
| 2 | काव्यवाचन स्पर्धा | आदर्श विद्‌यामंदिर | 1 सप्टेंबर 2024 | ख्वाईश नागवानी |
| 3 | Mind- Fest | | 17 सप्टेंबर 2024 | सहभाग- सुहानी धमगाये , वांशिक घागरे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | वादविवाद स्पर्धा | रोटरी क्लब | 24 सप्टेंबर 2024 | प्रथम- ख्वाईश नागवानी (सहभाग- वैदेही बांगडे, सबा नाझ) |
| 5 | समूह गीत गायन स्पर्धा | सर्वोदय आश्रम | 2 ऑक्टोबर 2024 | सहभाग- दीपश्री गावंडे, भाविका खरवाडे, शंकर दुर्गे, भूमिका मनघाटे, कौशिकी वैद्य |
| 6 | सुंदर कथाकथन स्पर्धा | डी. डी. नगर विद्यालय | 13 डिसेंबर 2024 | सहभाग- मानसी बांगडे |
| 7 | सुंदर वादविवाद स्पर्धा | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय | 19 डिसेम्बर 2024 | सहभाग- ख्वाईश नागवानी, अंजली सिंग |
| 8 | शब्दकोडे स्पर्धा | महिला महाविद्यालय | 18 जाने. 2025 | सहभाग- प्रगती जिरीत खान |
| 9 | रसग्रहण स्पर्धा | | | तृतीय - स्नेहा श्रीपाद |
| 10 | वाद विवाद स्पर्धा | जवाहरलाल नेहरू आर्ट्स कॉलेज | 20 जाने. 2025 | टीम चे तृतीय - ख्वाईश नागवानी, स्नेहा श्रीपाद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | वक्तृत्व स्पर्धा | राजाराम वाचनालय, नागपूर | 30 जाने. 2025 | सहभाग- मानसी बांगडे, वैदेही बांगडे |
| 13 | निबंध स्पर्धा | जी एस कॉलेज | 6 फेब्रुवारी 2025 | सहभाग-गुलनाझ पठाण , भावना ठवकर, नंदिनी धापोडकर, प्रियांका खडसे, सावली झोरे |
| 14 | कोलाज स्पर्धा | केवलरामानी महाविद्यालया | 7 फेब्रुवारी 2025 | प्रथम- भाविका खरवाडे |
| 15 | रांगोळी स्पर्धा | | | प्रथम- भाविका खरवाडे<br>तृतीय - प्रियंका खडसे<br>सहभाग- रिया खापरे, इशिका बुरडे |
| 16 | युवारंग समूहगीत स्पर्धा | रा. तु. म. नागपूर विद्यापीठ | 10 फेब्रुवारी 2025 | तृतीय - अंजली चव्हाण, वैदेही बांगडे, दीपश्री गावंडे, भाविका खरवाडे, शंकर दुर्गे, भूमिका मनघाटे, कौशिकी वैद्य |
| 17 | युवारंग पोस्टर स्पर्धा | रा. तु. म. नागपूर विद्यापीठ | 11 फेब्रुवारी 2025 | सहभाग- इतिषा जांगडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 18 | युवारंग पेंटिंग स्पर्धा | रा. तु. म. नागपूर विद्यापीठ | 11 फेब्रुवारी 2025 | सहभाग- पूनम भुरे |
| 19 | युवारंग रांगोळी स्पर्धा | रा. तु. म. नागपूर विद्यापीठ | 11 फेब्रुवारी 2025 | सहभाग- सुजिता शिरसाट |
| 20 | युवारंग मेहंदी स्पर्धा | रा. तु. म. नागपूर विद्यापीठ | 11 फेब्रुवारी 2025 | सहभाग- अलिशा शेख |
| 21 | स्वयंस्फूर्त स्पर्धा | जी एस कॉलेज | 11 फेब्रुवारी 2025 | तृतीय - स्नेहा श्रीपाद |

—--

Amrita

डॉ अमृता भुस्कुटे
विद्यार्थिनी उत्कर्ष मंडळ
श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय
महाल नागपूर